15 JUL 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षा विभागाने वाचवले १ कोटी २२ लाख

## एसआरपीडीची यशस्वी अंमलबजावणी; २२ अभ्यासक्रमांसाठी केला उपयोग

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरीची (एसआरपीडी) यशस्वीरीत्या अंमलबजावणी करत वर्षभरात विद्यापीठाचे १ कोटी २२ लाख ५४ हजार रुपये वाचवले आहेत. प्रिंटिंग, ट्रान्स्पोर्टेशन, सिक्युरिटी, मानधन व भत्त्यांच्या खर्चांना कात्री लावून २२ अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका पाठविल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे प्रश्नपत्रिका परीक्षेच्या दिवशी तासभर अगोदर पाठविण्यासाठीची ही सिस्टीम प्रभावी ठरली आहे.

> एसआरपीडीमुळे प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्रांवर पाठविणे सोपे झाले आहे. त्यामुळे विद्यापीठावरील खर्चाचा भार कमी झाला आहे. ही विद्यापीठासाठी नक्कीच जमेची बाजू आहे.
> **- महेश काकडे,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

विद्यापीठाचा परीक्षा विभाग व महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड यांच्यात परीक्षा विभागातील कामासंबंधीचा सामंजस्य करार २०१२ ला झाला. हा करार पाच पान २ वर »

# परीक्षा विभागाने वाचवले १ कोटी २२ लाख

» पान १ वरून

वर्षांसाठी अर्थात जुलै २०१७ पर्यंत कालावधीसाठी करण्यात आला. त्यानंतर फार्मसीची प्रश्नपत्रिका पाठविण्यास सुरवात झाली. अभियांत्रिकी, कायदा, एमसीए, एम. कॉम, एम. बी. ए, एम. एस्सीच्या सर्व शाखांच्या प्रश्नपत्रिका आता एसआरपीडीद्वारेच पाठविल्या जातात. या सिस्टीमद्वारे प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी एक हजार, तर ज्यादिवशी प्रत्येक केंद्रावर ती पाठवायची आहे, त्यासाठी शंभर रुपये असा दर करारानुसार निश्चित झाला. या सिस्टीमद्वारे २०१५ला १४६, तर २०१६ला अडीच हजार प्रश्नपत्रिका पाठविण्यात आल्या. कंपनीने त्याचे बिल सुमारे ६० ते ७० लाख पाठविले होते. करारानुसार एमकेसीएलने पाठविलेले बिल योग्य होते. मात्र परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांच्यासह परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी हे बिल कमी करण्यासाठीचा आग्रह एमकेसीएलकडे धरला. त्यासंदर्भातील कारणेही स्पष्ट केली. त्यानंतर एमकेसीएलने सुमारे ३४ लाख ५४ हजार रुपये वजा करत बिल पाठविले. दुसरे असे, की पूर्वी प्रश्नपत्रिकांची छपाई करून परीक्षा केंद्रांवर पाठविण्यावर खूप खर्च व्हायचा; शिवाय प्रश्नपत्रिका तयार करण्याचे मानधन, भत्तेही दिले जायचे. मात्र ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०१७ मध्ये हा खर्च एक, दोन लाख नव्हे, तर तब्बल ८८ लाख रुपये इतका कमी झाला आहे. एसआरपीडीद्वारे परीक्षेच्या दिवशीच प्रश्नपत्रिका ऑनलाईन परीक्षा केंद्रांवर पाठविली जाते. प्राचार्यांना त्यासाठी पासवर्डही दिला आहे. एमकेसीएलद्वारे विद्यापीठाला ई-सुविधा, स्टुडंट्स ॲक्रिडेशन व एसआरपीडी अशा ज्या तीन सेवा पुरविल्या जातात. परीक्षा विभागावरील कामाचा बोजा हलका करणारी ठरली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2017
पुण्यनगरी

# नेट-सेट प्राध्यापकांचा उद्या मेळावा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यांतील नेट-सेट प्राध्यापकांचा मेळावा रविवार, दि. १६ रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवनमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात प्राध्यापक महासंघाचे महासचिव प्रा. डॉ. एस. पी. लवांडे, एम्फॅक्टोचे माजी अध्यक्ष प्रा. सी. आर. सदाशिवन हे मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2017
महाराष्ट्र टाईम्स

## उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** क्रिडाई, शिवाजी विद्यापीठ कायदा विभाग आणि डिस्ट्रिक्ट लिगल सर्व्हिस ॲथारिटी यांच्या संयुक्त विद्यमाने रेरा कायद्याविषयी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (ता. १६ ) सकाळी साडेनऊ ते दुपारी दोन यावेळेत शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. यावेळी रेरा कायद्याचे तज्ज्ञ अधिकारी बी. डी. कापडनीस, डॉ. अभय नेवगी, ॲड. उदय बावीकर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेस उपस्थित राहून रेरा कायद्याबाबत माहिती घ्यावी, असे आवाहन क्रिडाई कोल्हापूरचे अध्यक्ष महेश यादव यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2017
तरूण भारत

# विद्यापीठामध्ये उद्या रेरा कायद्यावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ह्युमॅनिटीज्‌ ऑडीटोरीयममध्ये रविवार, १६ रोजी रेरा कायद्याविषयी सकाळी साडेनऊ वाजता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. क्रिडाई कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कायदा विभाग व डिस्ट्रीक्ट लिगल सर्व्हीस ॲथारिटी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. मुंबईचे रेरा ॲथारिटीचे ज्युडीशियल ऑफिसर बी. डी. कापडनीस, पुण्याचे नेवगी लॉ फर्मचे ॲड. अभय नेवगी, मुंबईचे कंझ्युमर लॉयर ॲड. उदय वावीकर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती क्रिडाई अध्यक्ष महेश यादव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2017
सकाळ

## रेरा कायद्याविषयी उद्या कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १४ : क्रेडाई, शिवाजी विद्यापीठ कायदा विभाग व डिस्ट्रिक्ट लिगल सर्व्हिस ॲथॉरिटीतर्फे रविवारी (ता. १६) रेरा कायद्याविषयी कार्यशाळा होत आहे. मानव्यशास्त्र इमारतीतील सभागृहात सकाळी साडेनऊ ते दोन या वेळेत कार्यशाळा होईल. रेराचे कायदेशीर अधिकारी बी. डी. कापडनीस, ॲड. अभय नेवगी, ॲड. उदय वावीकर मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी, प्राध्यापक, ज्येष्ठ नागरिक यांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे, असे आवाहन क्रेडाई कोल्हापूरचे अध्यक्ष महेश यादव यांनी केले आहे.

15 JUL 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आम्ही मुंबईला शिकत असल्यामुळे भूगोलाच्या पुस्तकात सांगितल्याप्रमाणे मुंबईसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचे वैशिष्ट्य मनात घर करायचे. मुंबई श्रीमंत वाटायचीच, पण नागपूरची संत्री, वसईची केळी, नाशिकची मोसंबी, श्रीरामपूरची बोरे असं बरंच काही त्याहीपेक्षा श्रीमंत वाटायचं. नंतर गावी परतलो, तसं इथला भूगोल अभ्यासायला मिळाला. कोल्हापूर जिल्ह्याच्या वैशिष्ट्यांची भुरळ पडायला लागली. कोल्हापुरी चप्पल आणि गुळाचा गोडवा मनाला भावू लागला. पण इथल्या तालुका पातळीवरील वैशिष्ट्यांचा धांडोळा काही घेता आला नाही. नोकरीनिमित्त आजरा या तालुक्याच्या गावी स्थायिक झालो आणि आजरा श्रीमंत वाटू लागला. याला महत्त्वाची कारणं ठरली ती इथल्या तांबड्या मातीत फुलणारी, डोलणारी सुवासिक भात वाणं. आता येत्या दोन वर्षांत आजऱ्याचा घनसाळ डोलू लागेल, नक्कीच.

# दरवळतोय घनसाळ

▶▶ **रमेश चव्हाण,** आजरा

नव्वदच्या दशकात जुन्या-जाणत्यांकडून या मातीतल्या अस्सल घनसाळ, कोतमिरसाळ, जिरेसाळ, काळा जिरगा, चाफेकळीसारख्या सुवासिक नी स्वादिष्ट भातपिकांच्या रसरशीत गोष्टी ऐकायला मिळू लागल्या. पण या तांदळांची चव काही चाखता येत नव्हती. हा तांदूळ चाखायला लाभणे तसं भाग्याचंच लक्षण. कारण अनेकविध कारणांमुळं आज-यातील पन्नासहून अधिक स्थानिक पण अस्सल तशीच सुवासिक वाणं जवळपास अस्तंगत झाली होती. काही जातीवंत शेतक-यांनीच पाहुणे-पै राखण्यासाठी आणि कधीतरी सणासुदीला चव चाखण्यासाठी यातील घनसाळसारखी काही वाणं पेरती ठेवली होती. नाहीतर आणखी काही वर्षात ही वाणंदेखील खरोखरच नष्ट झाली असती. आणि मग एखाद्या दंतकथेप्रमाणे या सुवासिक वाणांच्या रम्य कथा ऐकून गप्प बसावं लागलं असतं. पण असं झालं नाही.



आजरा तालुक्याची भौगोलिकताच निराळी. आणि म्हणूनच या तालुक्याला स्वातंत्र्योत्तर काळात केवळ एकदाच आमदारकीचा टिळा लाभला. नाहीतर सातत्याने इतर कोणत्या तरी तालुक्याशी फरपटत जाण्याचे दुर्दैव पाचवीलाच पुजलेले. कोणीच वाली नसल्याच्या स्थितीत तालुक्याला संघर्ष करीतच विकासाची कास धरावी लागली. इथली माणसंही इतकी कणखर की रस्त्यावरच्या लढाईला न घाबरणारी. कधीही हाक मारली तरी आंदोलनाला ठळकपणे हजेरी ठरलेली. विकासाची असो, संस्थात्मक स्थापनांची असो, कला-सांस्कृतिक सोहळ्याची असो, प्रकल्पग्रस्तांची असो, अंधश्रध्दा निर्मूलनाची असो, नाहीतर अन्याय-अत्याचारा विरोधात उभे ठाकण्याची असो. आजरेकरांची लोकचळवळ म्हटले की सातत्याने यशाचा तिलक इथे मिळतोच. याला कारणीभूत आहे ती केवळ आणि केवळ कणखर मानसिकता.

याच बळावर साधारणत: एक तपापूर्वी अस्तंगत घनसाळ वाण संवर्धनाच्या चळवळीने इथे बाळसे धरले. कोणाचाही वरदहस्त नसताना केवळ शेतक-यांच्या मनगटावर ही चळवळ उत्कर्ष-बिंदूला पोहोचली. संपूर्ण तालुक्यात केवळ काही एकरांपुरता आणि काही मणांमध्ये पिकणारा हा भात हळू हळू वाढू लागला. यासाठी तालुक्याचा पश्चिम-दक्षिण परिसर घनसाळ संवर्धनासाठी पूरक ठरला. कृषी-तांत्रिक माहितीच्या बळावर दाभिल परिसरातील शेकडो एकर जमिनीत घनसाळ संवर्धन प्रकल्प साकारला. रोपलावणीनंतर सुमारे १६०-१७० दिवसांच्या कालावधीनंतर कापणीस येणा-या या वाणामुळे अवघा परिसरच घमघमायला लागला. मळण्या काढल्यानंतर शेतक-यांची घरे आणि पोटमाळे घनसाळच्या कणग्या, तट्टे आणि पोत्यांच्या थप्प्यांनी गच्च होऊ लागले. सुवासाप्रमाणेच इथल्या घनसाळ उत्पादनाच्या माहितीने खवय्यांबरोबरच व्यापीरीही शेतक-यांकडे चकरा मारू लागले. अस्सल घनसाळची किंमत कळून शहाणे-सवरते झालेल्या शेतक-यांनी आपल्या घामाचे पुरेपूर दान पदरात पाडून विक्रीला सुरवात केली. दरवर्षी दमदार किंमत मिळू लागल्याने उत्पादन थांबविलेल्या शेतक-यांनीही घनसाळ उत्पादीत करायला सुरवात केली. यामुळे काही मणांपुरते शिल्लक राहिलेले हे दुर्मिळ वाण आता शेकडो क्विंटलमध्ये पिकू लागले आहे. घनसाळ वाण संवर्धन चळवळ खरोखरंच आजरेकरांची सक्सेस स्टोरी बनली.

तुलनात्मक विचार करता, काळा जिरगा आणि चाफेकळीच्या वाणसंवर्धनाची गती कासवाचीच राहिली, पण घनसाळने मात्र आपली छाप परिसर, राज्य नी देशापुढेही जात सातासमुद्रापार उमटवायला सुरवात केलीय. घनसाळच्या यशस्वी संवर्धनानंतर बाजारपेठीय फायदा उचलण्याचे तंत्र जरी शेतकरी उठवत असले तरी त्यामध्येही काही लूपहोल अद्याप राहिले होतेंच. शेतक-यांना नाडवून कमी दराने खरेदी करणे, भेसळयुक्त विक्री करणे, घनसाळच्या नावाखाली दुसरेच वाण ग्राहकांच्या माथी मारणे यासारख्या अवगुणी कारवायांना पायबंद घालणे आणि शुध्द घनसाळ खवय्यांपर्यंत पोहोचवून आज-याचा घनसाळ हे ब्रीद सार्थकी लावण्यासाठीच वर्षभरापूर्वी आजरेकरांनी घनसाळचे जीआय मानांकन मिळविले आहे. यामुळे हे वाण उत्पादन व विक्रीवर आता आजरेकरांचा हक्क असेल. आता यापुढचेही पाऊल उचलले गेले आहे. कालौघात रासायनिक खतांचा मारा अथवा इतर कारणांमुळे हरवलेला घनसाळचा अंगभूत सुवास व स्वादिष्टपणा पुन्हा मिळविला जात आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि भाभा अणूसंशोधन संस्थेद्वारे संयुक्त प्रयत्न होत आहेत. गेल्या वर्षी सुरू झालेल्या या संशोधनांतून सकारात्मक परिणाम हाती मिळाले आहेत. त्यामुळे २०१९ पर्यंतच्या संशोधन नियोजनाप्रमाणे आज-याचा अस्सल घनसाळ आपल्या ऐतिहासिक दुर्मिळ सुवासाने व स्वादिष्टपणाने पुन्हा एकदा दरवळू लागेल, यात तिळमात्रही शंका नाही.